# उती संवर्धन प्रकल्प
# मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

दिनांक : ०५.०३.२०११

उती संवर्धन प्रयोगशाळा, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील कामे करण्यासाठी खालील कामाचे दरपत्रक मागावयाचे आहेत.

१. कांच पात्र दररोज जंतुनाशक द्रवाने धुऊन साफ करणे
(दर प्रती नग कांच पात्राचा देणे)

२. प्रयोगशाळा व प्रत्येक खोली परिसर दररोज झाडून साफ करणे, जंतुनाशक द्रवाने प्रयोगशाळा दररोज पुसुन घेणे आणि प्रयोगशाळेच्या कांचाच्या खिडक्या व भिंती साफ करणे
(दर एका महिण्याचा देणे)

३. रोपे पिशव्यात लावणे

अ. रेती चाळणे पॉलीथीन पिशव्यात भरणे व त्या हरितगृहात नेऊन ठेवणे आणि त्यामध्ये केळी व ऊसाची रोपे लाऊन रोपाला विक्री होईपर्यंत पाणी घालणे. (दर प्रती हजार पिशव्याचा देणे)

ब. खत, रेती, माती चाळणे त्यांचे मिश्रण तयार करणे ते मिश्रण पॉलीथीन पिशव्यात भरणे त्या पिशव्या हरितगृहात नेऊन ठेवणे आणि त्यामध्ये ऊसाची रोपे लाऊन रोपाला विक्री होईपर्यंत रोपाला पाणी घालणे. (दर प्रति हजार पिशव्याचा देणे)

क. खत, रेती, माती चाळणे त्याचे मिश्रण तयार करणे ते मिश्रण पॉलीथीन पिशव्यात भरणे त्या पिशव्या हरितगृहात नेऊन ठेवणे आणि त्यामध्ये केळीची रोपे लाऊन रोपाला विक्री होईपर्यंत पाणी घालणे. (दर प्रति हजार पिशव्याचा देणे)

प्रत्येक कामाचे दर पत्रक वेगळे वेगळे द्यावे.

कामाचे स्वरुप प्रत्यक्ष पाहाणी करुन घेण्यासाठी प्रयोगशाळेत. पाहणी करावी व कामासंबंधी अधिक तपशिल ऊती संवर्धन कार्यालयात उपलब्ध होईल हि कामे करुण घेण्यासाठी. नोदंणी कृत व या कामाचा किमान दोन वर्षे अनुभव असणाऱ्या एजंन्सीकडून त्यांचेच लेटर हेडवर दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दरपत्रक भरते वेळी कत्रांटदाराने कत्राटंदाराचे नोदंणी पत्र, पॅनकार्ड व सन २००९-२०१० या वर्षाचा कर भरणा केल्याचा पुरावा याच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात दर पत्रका सोबत रु. १०००/- (एक हजार) चा राष्ट्रीय कृत बॅकेचा डिमाड ड्राफ्ट नियंत्रक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे नांवे काढुन सोबत जोडावा. कामाचे आदेश देण्यापूर्वी रु. १००००/- (दहा हजार) चा राष्ट्रीय कृत बॅकेचा एफडीआर स्वरुपात सुरक्षा ठेवावी लागेल.

तसेच प्रयोगशाळेतील कामे सुरु करण्याच्या आगोदर रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर व्यवस्थीत कामे करण्याचे हामी पत्र द्यावे लागेल. दरपत्रक दिनांक १५.०३.२०११ या तारखेपर्यंत सुटया वगळून दुपारी १६.०० पर्यंत प्रभारी अधिकारी, ऊती संवर्धन प्रकल्प, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे.

कोणतेही कारण न देता कोणतेही एक / अनेक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार समीतीने राखून ठेवला आहे.

**प्रभारी अधिकारी**
**उती संवर्धन प्रकल्प**
**मकृवि, परभणी**